मुद्दा क्र.-३ 23/01/25

**नवीन पर्यायी गावठाण खापरी (रेल्वे) (बाधित गाव मौजा-कलकुही, तेल्हारा, दहेगांव व खापरी (रेल्वे) येथील संमिश्र शाळा (Composite School) चे हस्तांतरणाबाबत.**

**<u>हस्तांतरण टिपणी</u>**

| | | |
|---|---|---|
| कार्यभार हस्तांतरण करणारे अधिकारी | : | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र विमानतळ विकास कं. मर्या. नागपूर. |
| कार्यभार स्विकारणारे अधिकारी | : | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर. |

**<u>प्रस्तावना :-</u>** ग्रामिण भागातील कलकुही (गावठाण), तेल्हारा (गावठाण), दहेगांव (गावठाण) व खापरी (रेल्वे) (गावठाण वगळुन) गावांचे पुनर्वसन ४५ हेक्टर क्षेत्रात करण्यात आले. पुनर्वसित भागात शेतकरी कुटुंबाला घर बांधण्यासाठी ३०० चौ.मि. भूखंड व त्यावर ३३.०६ चौ.मि. क्षेत्राचे सदनिका बांधकामासह देण्यात आले आहे. बिगर शेतकरी कुटुंबाला १५० चौ.मि. क्षेत्राचा भूखंड त्यावर ३३.०६ चौ.मि. क्षेत्राचे सदनिका बांधकामासह देण्यात आले.

खापरी रेल्वे येथील पर्यायी गावठाणात तयार करण्यात आलेल्या नागरी सुविधेअंतर्गत डांबरीकरण केलेले अंतर्गत रस्ते, नळ पाणीपूरवठा योजना, विद्युत पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, प्राथमिक आरोग्य केंद्र, दहन व दफन भूमी व इतर नागरी सुविधेंचे हस्तांतरण गटविकास अधिकारी पंचायत समिती, नागपूर यांना दिनांक ०१/०३/२०१८ रोजी करण्यात आलेले आहे. तसेच उक्त संपूर्ण नागरी सुविधा गटविकास अधिकारी जि.प. नागपूर तर्फे मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांचे उपस्थितीत दिनांक २९/०३/२०२३ रोजी ग्रामपंचायत खापरी (रेल्वे) (कलकुही) यांना हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत.

पर्यायी गावठाणात तयार करण्यात आलेल्या संमिश्र शाळा (Composite School) चे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, ते जिल्हा परिषद, नागपूर यांना हस्तांतरीत करण्यात येत आहे.

**तांत्रिक बाबी :-**

१) **संमिश्र शाळा** (Composite School Building) :- संमिश्र शाळेचा भूखंड (Composite School) एकुण क्षेत्रफळ १००००.७३ चौ.मि. चा असून, यामध्ये शाळेचे बांधकाम ११४३.७० चौ.मि. क्षेत्रात करण्यात आलेले आहे. शाळेमध्ये एकुण ९ वर्ग खोल्या, मुख्याध्यापकांचे कार्यालय, स्टाफ खोली, लिपीकीय खोली, स्टेशनरी खोली, ग्रंथालय/वाचनालय खोली, रेकॉर्ड रुम, लॅब व कॉम्प्युटर इत्यादी खोल्या आहेत. तसेच मुली व मुलांकरिता स्वतंत्र शौचालये बांधण्यात आले आहेत. याशिवाय मुली/मुलांकरिता खेळाचे मैदान उपलब्ध असून शाळेच्या संपूर्ण परिसराला संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यात आले आहे. प्रवेश दारावर सुरक्षा रक्षक कक्ष आत व बाहेर जाण्याकरिता स्वतंत्र व्दार देण्यात आलेले आहे.

२) **अंतर्गत रस्ते** :- अंतर्गत रस्ते हे सिमेंट कॉंक्रीटचे बांधण्यात आले आहे. रस्त्याची रुंदी ३.७५ मी. व ५.०० मीटर असून एकुण लांबी २७५ मी. इतकी आहे.

३) **विजपुरवठा** :-

अ) **बाह्य विद्युतीकरण :-** शाळेच्या आवारात विजेचे खांब व अनुषंगीक उपकरणे उभारुन बाहय विदयुतीकरणाचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

ब) **अंतर्गत विद्युतीकरण** :- शाळेच्या इमारतीत अंतर्गत विदयुतीकरणाचे तसेच आवश्यक उपकरणासहीत (उदा. पंखे, टयुब लाईट इत्यादी) काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

४) **मलनिस्सारण योजना** :- शाळेच्या आवारात मलनिस्सारणाकरिता भूमीगत गटार योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यासाठी १५० मि.मी. ते ३०० मि.मी. व्यासाचे पाईप व आवश्यक चेंबर्स इत्यादीच्या तरतुदीसह मलनिस्सारण योजना पूर्ण करण्यात आली आहे.

५) **नळ पाणी पुरवठा योजना** :- शाळेच्या आवारात पिण्याच्या पाण्यासाठी व वापरासाठी स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना उभारण्यात आली आहे. १ लक्ष लीटर क्षमतेची भूमिगत टाकी

आणि २०,००० लीटर क्षमतेची टाकी शाळेच्या इमारतीवर ठेवण्यात आलेली आहे. वितरीका (१५ मी.मी., ५० मी.मी., ते ८० मी. मी. व्यासाचे पाईप) व व्हॉल्व, चेंबर व इत्यादी तरतुदीसह पाणीपुरवठा योजनेचे बांधकाम पुर्ण करण्यात आलेले आहे.

| हस्तांतरण करणारे अधिकारी | स्विकारणारे अधिकारी |
|---|---|
| अधीक्षक अभियंता<br>महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी<br>मर्या. नागपूर | उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद नागपूर. |

Education Officer (Pry.)
Zilla Parishad Nagpur

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर.

B.D.O
P.S.

...कार्यकारी

उपसरपच
ग्राम पचायत खापरी (रेल्वे) (कलकुई

S.R.Bhuse